: प्रकरण दुसरे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील अनुभवविश्व

UNIVERSITY
KOLHAPUR

प्रकरण दुसरे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील अनुभवविश्व

## २.१. प्रास्ताविक :

प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणामध्ये 'मराठी कथावाङ्मयाची वाटचाल व तिच्यातील ग्रामीण कथाकारांचे योगदान' हे आपण जाणून घेतले. आता प्रबंधिकेच्या ह्या दुसऱ्या प्रकरणामध्ये रा. रं. बोराडयांच्या कथांमधील अनुभवविश्वाचा विचार करावयाचा आहे. तत्पूर्वी रा. रं. बोराडयांचा व्यक्तिपरिचय आधी करून घेऊ.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | रावसाहेब रंगराव बोराडे |
| जन्मस्थळ | : | काटगाव, ता. जि. लातुर (मराठवाडा) |
| जन्मदिनांक | : | २५ डिसेंबर १९४० |
| शिक्षण | : | एम्.ए. (मराठी) |
| व्यवसाय | : | सेवानिवृत्त प्राचार्य |

रा. रं. बोराडयांचा जन्म मराठवाडयातील काटगाव (ता. जि. लातुर) ह्या खेडयात एका शेतकरी कुटुंबात झाला. ते खेडे, तसेच त्यांच्या अवतीभवतीचा म्हणजे साधारणत: अरणी, सारणी, सुगाव, मुरुड, औसा व लातुर ह्या परिसर - पट्ट्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला सहज जाणवतो. मराठवाडयातील हा भाग पूर्वी सदैव दुष्काळीच असे. दुसरे म्हणजे तेथे बराच काळ निझामी राजवट होती. शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. जे शिक्षण दिले जात होते, ते अतिशय मर्यादित आणि उर्दू माध्यामाचे होते. त्यामुळे हा भाग शिक्षणापासून काहीसा वंचितच राहिला. साहजिकच दारिद्रय तेथे स्थान मांडून बसलेले होते. रोजगार शोधत लोक पोटासाठी रानोमाळ धावत होते. ह्या माणसांची जगण्यातील अगतिकता आणि आस्थिरता बोराड्यांना लेखनास प्रवृत्त करते. त्यांची प्रकाशित पुस्तके एकूण ३५. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे: कथासंग्रह १५ व नरहर कुरुंदकर संपादित १, कादंबऱ्या ७, नाटके ३, एकांकिका ४, वगनाटये २, पथनाटय १, समीक्षा लेख संग्रह १ आणि बालकादंबरी १.

रा. रं. बोराडे हे ग्रामीण साहित्यिक म्हणून मराठी साहित्यविश्वामध्ये परिचित आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, वगनाटय, इ. अनेक वाङ्मयप्रकार हाताळले असले, तरी त्यांचा लेखनाचा पिंड

हा कथाकाराचाच आहे. कथाकार म्हणूनच त्यांची ख्याती अधिक आहे. ग्रामजीवन हेच त्यांच्या कथेचे क्षेत्र आहे. म्हणूनच त्यांची कथा ही 'ग्रामीण कथा' आहे. ही कथा त्यांच्या पुढील १५ कथासंग्रहांमधून पहावयास मिळते: १. 'पेरणी' (कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२), २. 'ताळमेळ' (व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६६), ३. 'मळणी' (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९६७), ४. 'वरात' (प्रपंच प्रकाशन, पुणे, १९७३), ५. 'नातीगोती' (लोकवाङ्मय गृह मुंबई, १९७५), ६. 'बोळवण' (विशाखा प्रकाशन, पुणे, १९७६), ७. 'वाळवण' (व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७६), ८. 'फजितगाडा' (प्रपंच प्रकाशन, पुणे, १९७६), ९.'माळरान' (विशाखा प्रकाशन, पुणे, १९७६), १०.'राखण' (रोही प्रकाशन, पुणे, १९७८), ११.'गोंधळ' (विशाखा प्रकाशन, पुणे, १९७८), १२. 'बुरूज' (अक्षर प्रकाशन,औरंगाबाद, १९७८), १३. 'खोळंबा' (विशाखा प्रकाशन, पुणे, १९८३), १४. 'हेलकावे' (साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९०) आणि १५.'कणसं आणि कडबा' (साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४) व नरहर कुरुंदकर संपादित 'वानवळा' (अमेय प्रकाशन, नागपूर, १९७९).

'पेरणी' हा कालानुक्रमे पहिला आणि 'कणसं आणि कडबा' हा कालानुक्रमे १५ वा आणि सध्या तरी अखेरचा कथासंग्रह होय. प्रारंभीच्या कथालेखनाच्या प्रेरणा आणि अगदी अखेरच्या कथालेखनाच्या प्रेरणा ह्या दोन कथासंग्रहांच्या अभ्यासातून हाती लागू शकतात. बोराडयांची १९६० च्या दरम्यानची प्रेरणा आणि प्रवृत्ती पुढे कशी बदलत गेली, तिने नवनवीन बदल अंगीकारत स्वत:चा वेगळा ठसा कसा निर्माण केला, तिला नवतेचे बाळसे कसे चढू लागले, हेही ह्यातून कळू शकते.

बोराडयांच्या लेखनाचा खरा प्रांत हा कथा लेखनाचाच आहे. परंतु सध्या त्यांचे कथालेखन पूर्णत: थांबले आहे, ह्या बाबतीत बोराडे म्हणतात, "गेल्या दोन वर्षांपासून मी कथालेखन पूर्णत: थांबविलेले आहे. कथा या वाङ्मयप्रकारात मी काही नवं, वेगळं देऊ शकेन, असं मला वाटत नाही. कथालेखन थांबविण्याच खर कारण हे आहे."[१]

'पेरणी (१९६२) व 'कणसं आणि कडबा'(१९९४)' ह्या दोन कथासंग्रहांच्यामधील अनुभवविश्व आपण जाणून घेऊ. लेखक कोणत्याही कालखंडातील असो, कोणत्याही वाङ्मयप्रकारात कलात्मक निर्मिती करणारा असो, त्याच्या कलात्मक निर्मितीमध्ये त्याच्या जीवनानुभवांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. त्याने जे भोगले, सोसले, अनुभवले व जे जे म्हणून पाहिले असेल; तेच आणि त्याच्या आसपास घडणाऱ्या घटनाप्रसंगांवरच तो लिहीत असतो. तसेच आजुबाजूचे वातावरण व त्याच्यावर घडणारे चांगले अथवा वाईट संस्कार ह्यातूनच त्याची लेखणी लक्षणीय ठरु लागते. अशा ह्या घटकांमधूनच त्याचे अनुभवविश्व आशयसंपन्न होत राहते. कथाकार हा आपल्या कथेतून जीवनदर्शन

घडविताना आपल्या जीवनातील एखादादुसरा नाटयत्मक प्रसंग पकडून तो कथेत गुंफण्याचे धाडस करीत असतो. तेवढे सामर्थ्य त्याच्या जवळ असते. त्याचा जीवनाकडे पाहण्याचा जो काही दृष्टिकोन असतो, त्या अनुषंगाने तो तात्त्विक मूल्यांची जोपासना आपल्या कथेतून करीत असतो. अशा व्यवहारातून त्याचे अनुभवविश्व साकारत जाते.

## २.२. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व :

'पेरणी' (कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२) ह्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व पाहता बोराडयांनी माणसांच्या दैनंदिन जीवनातील प्रसंग व त्यांचे अनुभव गांभीर्याने शोधलेले दिसतात. प्रामुख्याने ते माणसांचाच शोध घेतात. वरवर पाहता माणसाच्या साध्या वागण्यातून, साध्या बोलण्यातून व परिचितातून अपरिचित अशा खोल विश्वाचा शोध घेताना ते समाजजीवनातील सामान्य - अतिसामान्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीचा खोलवर जाऊन तळ शोधताना दिसतात. मग ही माणसे सर्वसामान्य स्तरातील असोत, मध्यमवर्गीय स्तरातील असोत अथवा उच्चवर्णीय सांस्कृतिक वातावरणातून आलेली असोत, ती नियतीपुढे काहीशी हतबल ठरलेली आहेत. त्यामुळे बोराडयांच्या कथा काही अंशी गंभीर वाटतात.

'पेरणी' ह्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व विशेष नावीन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण आहे. विशेषत: कौटुंबिक विश्वातून ह्या कथासंग्रहामधील बहुतांश कथा साकारत जातात. ''पीळ'', ''ताण'', ''हुरडा'', ''हुंदका'', ''खानदान'' आणि ''पेरणी'' ह्या कथा तशा होत.

''पीळ'' ह्या कथेमधून कौटुंबिक वातावरण, ताणतणाव, व्याह्यांमधील मतभेद व त्यामुळे उध्दवस्त होऊ घातलेले सुभाचे कौटुंबिक भावविश्व समोर येते. व्याह्यांमधील मतभेदांमुळे सुभाला तिचा नवरा कधीही माहेरी न पाठविण्यासाठी घेऊन जातो. इकडे पारवती मुलीला पाहण्यासाठी तळमळत राहते. तिला पाहिल्याशिवाय अन्नपाणी घेणार नाही, असे ती यशवंताजवळ सांगून टाकते. ह्यातून मार्ग म्हणून सुभाचा भाऊ यशवंता व दिनकर हे दोघे एक योजन आखतात व बहिणीला 'काढून' आणावयाचे ठरवितात. आबा स्वत:च्या संसारापेक्षा लेकीचा संसार जास्त महत्त्वाचा मानतात व तिला काढून आणण्याचा बेत हाणून पाडतात त्यामुळे ह्या वातावरणातून सुभाची गळचेपी होते.[२]

''ताण'' ह्या कथेमधील भावविश्व हे कौटुंबिक भावविश्वापेक्षा थोडे वेगळे असले, तरी कथेत सर्वत्र कौटुंबिक वातावरणच दिसते. ग्रामीण भागात जावयाला असणारे महत्त्व, त्याला दिली जाणारी वागणूक व त्याचा केला जाणारा पाहुणचार विशेष असतो. ह्या कथेमध्ये मात्र जावयाची फिरकी घेतलेली दिसते. आबाराव पाटलाचा हा जावाई काहीसा स्त्रीलंपट आहे.तो आपली पत्नी पारबती

हिच्या माहेरी येण्याबरोबर लगोलग मागेमागे कसा येतो आणि त्याची खोड मोडण्यासाठी म्हणून आबाराव पाटील कशा युक्त्या करतात, हेच मुख्य आशयसुत्र ह्या कथेमधून गुंफलेले दिसते. नको नकोते प्रश्न विचारून त्याला आख्खी रात्र जागरण करायला लावतात, व त्याची पुरती खोड मोडतात.[३] अशा ह्या कथेतून प्रथम दर्शनी गंभीरतेचे सूर निघतात, तरीदेखील ही कथा सुखात्म जाणीव करून देणारी आहे.

''हुरडा'' ही बेहोश आनंदाची कथा असून ती कौटुंबिक जिव्हाळा, रूढी, संकेत व परंपरा ह्या गोष्टींना बिलगून बसणारी कृषिप्रधान समाजव्यवस्था व्यक्त करते. काही अंशी ह्या कथेचा आशय भावनिक व वासनापूर्तीकडे झुकलेला दिसतो. परंतु ह्या अनुभूतीत बोराडे त्या व्यक्तिरेखेचा संयम दाखवून कथा अनुभवसंपन्न बनवतात. कथानायक बाजी हा ह्या कुटुंव्यवस्थेतील आशय फुलविणारा घटक असून तो पायाची तिडी टाकून झोपलेला असतो. ऊन्हे पडू लागली, तरी आज त्याला शेताकडे जा कोणी म्हणत नसते. उलट घरातील प्रत्येक जन त्याला चेष्टेने, आपुलकीने, आदबीने बोलत असते. त्याचा पटका कोणीतरी लपवून ठेवलेला आहे, हे ही त्याच्या लक्षातच येत नाही. ह्या कथेतून शेतीहाच कुटुंबाचा आणि वासनेचा जागृतिघटक दिसतो. कारण हुरडयात आलेली शेते, पाखरांचा किलबिलाट हा जसा कृषिउत्पन्नाच्या परिपक्वतेचा घटक होय त्याचप्रमाणे ह्या मोसमातच बाजीची बायको 'ऋतुपूर्ण' होते, 'वयात येते' म्हणून त्याचा पटका चोरून ठेवलेला असतो. अशा प्रकारे काही रूढी, परंपरा पाळलेल्या दिसतात. असा अनुभव सांगणारी ही कथा बाजीच्या उद्‌गारांनी अधिक आत्मगर्भ बनते. आनंदाच्या बेहोशीत बाजी शेताकडे धावतो.वाटते सखा कातळेच्या हाकेला आवाज देत, ''आमच्या बी शेतात झाला की आता हुरडा,'' असे म्हणून तो बेहोशीच्या आनंदात पळतच सुटतो.[४]

''हुंदका'' ह्या कथेमधील आशय काही प्रमाणात 'ताण' ह्या कथेमधील अनुभवाशी मिळताजुळता वाटतो. पितृसत्ताक कुटुंबपध्दती व कृषिप्रधानता ह्या संस्कृतीत पित्याला महत्त्व असते. ग्रामसंस्कृतिचे हे रूप दाखविण्यात ही कथा रमते. कथेचा अनुभव विषयच मुळी 'हुंडा', हुंडयाच्या पैशामुळे व्याह्यांमध्ये पडलेला तिडा असा आहे. पुरूषप्रधान कुटुंबपध्दती व वासनेचा स्वाभाविक हुंकार ह्या दोहोंमधून ह्या कथेतील अनुभवविश्व आकाराला येते. नुकतेच रानबाचे लग्न झालेले असते. त्याला पत्नी हवी हवीशी वाटते. तिच्या माहेरचे लोक तिला सासरी पाठवण्यास तयार असतात, परंतु हुंडयाच्या पैशामुळे व्याह्यांचे पटत नाही. रानबाला त्याचे वडील आबा रागारागाने म्हणतात, ''भडव्या, काई वाटतंया का, असं बोलाया ? म्हनं सोडून द्या. त्ये काय फुकटचे पैसे हायीत व्हय सोडून द्यायला. हुंडयांतलं पैसं हायीत.''[५] असे संवाद कथेतील संबधित अनुभव वाचकांच्या समोर दृष्टिगोचर करतात.

ह्यातून रानबाचा भावनिक कोंडमारा होत राहतो. बरोबरीच्यांना दोन दोनं मुल झाली, असा विचार त्याच्या मनात येत राहतो.

'खानदान' ही कथासुध्दा पितृसत्ताक कुटुंबपध्दती व कृषिप्रधानता ह्याच अनुभवविश्वाचे दर्शन घडविते. माणसाच्या आयुष्यात अशाकाही सुख दुःखाच्या घटना घडतात की, त्या सर्व सुखदुःखाला आपण कारणीभूत आहोत, असे त्याला वाटत राहते. येथे कुटुंबप्रमुखाचा निर्णय अंतिम मानला जातो व त्यातून कसे अनर्थ घडतात हा 'खानदान' ह्या कथेचा विषय आहे. खानदानी घराण्यातील कमाचे लग्न बापूसाहेब हे तेवढयाच तोलामोलाच्या खानदानात जयसिंग्याशी ठरवतात. लग्नाला काही मिनिटेच बाकी असताना जयसिंग्या मुलगी पसंत नाही म्हणतो व त्या प्रसंगी झालेली कुटुंबप्रमुखाची धावपळ असा अनुभव घेऊन ही कथा जन्माला येते. पूर्वी पासून चालत आलेले खानदानाचे वैर येथे मुलांवर काढण्याचा प्रयत्न केला जातो. शेवटी घराण्याची इज्जत जाऊ नये म्हणून बापूसाहेबांनी जयसिंग्याची पाचही बोटे पिवळी करावी, असे ठरते.[६]

''पेरणी'' ही कथासुध्दा अशाच आशयाची असून ती कृषिसंस्कृती मधून रूजलेली, बहरलेली आहे. ह्यातील बळीने मेहनत करून पिकास योग्य बनविलेले मेहुणीच्या वाटणीचे शेत हे प्रतीकात्मक रूप घेऊन येते व आपण केलेली ही मेहनत वाया जाऊ नये, असे त्यास वाटत राहते. ह्यातून ही कथा पुढेपुढे सरकत खुलत जाते. बळीने आज पर्यंत त्याची लहान बिनकामी मेहुणी सांभाळली, मोठी केली आणि आता ती वयात आल्याने शेतासह दुसऱ्याच्या हातात जाईल, तेव्हा तिलाच दुसरी बायको करून घेण्याची 'पेरणी' बळी ह्या ठिकाणी करतो. शेतीच्या प्रेमातून निर्माण झालेली ही बळीची भावना शेवटी शेतीपाशीच येवून थांबते. येथे पऱ्यागाचे पुढील ठाम बोलणे सबंध कथेचा आशयच बदलून टाकताना दिसते. कसे ते पहा: ''खबरदार, असलं पाप मनात आनताल तर. माईनं जेवढं तिच्या नावावर केलंया, तेवढं सारं तिचं तिला द्या. त्यातल्या एका पसुडीवर बी नजर ठिवू नका. माजी आन हाय तुम्हाला. आमकी आमकी न आपल्या बहिणीचं खाल्लं, असलं आक्रीत नकु माज्यावर, आन् काई बी करून मारगशिरसापतर उजवून टाका तिला. लगीन लांबाया लागलं, तर लोक म्हणतेल, भयनीचं खायला मिळतंया म्हणून मुद्याम लांबणीवर टाकाया लागलीया.''[७]

अशा प्रकारे ग्रामसंस्कृती आणि तेथील रीतिरिवाज हे मोठया कुशलतेने कथेतून मांडले म्हणूनच बोराडयांच्या कुटुंबकथेतील वातावरण अनुभव प्रधानतेकडे, आशयप्रधानतेकडे झुकलेले दिसून येते. येथे खऱ्या अर्थाने त्यांची कुटुंबकथा आशयघन व समृध्द होते. कारण ग्रामीण जीवनातील एकएक पदर अशा कुटुंबकथेतून उकलत गेलेले वाचकांना पहावयास मिळतात. अर्थात् कौटुंबिक भावविश्वच ह्या

कथांमधून आपल्या डोळयांसमोर उभे राहते. ह्या अनुभवविश्वातून बोराडयांची अनुभव घेण्याची पध्दती व संवेदनशीलता दिसून येते. हे अनुभवविश्व भावनिकतेतून फुलत असताना बोराड्यांची अलिप्तताही जाणवते. शिवाय त्यांची कलात्मकताही प्रत्ययाला येते.

'पेरणी' ह्या कथासंग्रहामधील 'अभ्यास', 'भल्या घरचे पाहुणे', 'सांगावा' व 'झाड' ह्या कथा विशेष नावीन्यपूर्णतेने बालमनाचा धांडोळा घेत असल्याचे दिसून येते. ह्या कथांमधून प्रामुख्याने लहान मुलांचे भावविश्व साकार झालेले आहे. परंतु ह्यातील प्रत्येक कथा ही अनुभवाची एक वेगळीच छटा पकडताना दिसते. नियतीचा माणसावरील पगडाच ह्या कथांमधून दिसून येतो. माणूस आणि नियती ह्यांच्यातील संघर्षाच्या कथा असे ह्या कथांचे स्वरूप बनते.

बालमनाचे अनुभवविश्व साकारणाऱ्या कथांमध्ये सगळयात वरच्या दर्जाची कथा म्हणून 'अभ्यास' कथेचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. केवळ बालमनाचे चित्रण करावयाचे म्हणून बोराडे हे चित्रण करत नाहीत, तर त्यांनी अनुभवलेल्या ग्रामविश्वाच्या अनुषंगाने अगदी अपरिहार्यपणे येणाऱ्या बालकांच्या जीवनाचे चित्रण ते करतात ह्या कथेतील विधवा बाई व तिचा एकमेव आधार असलेला मुलगा सोन्या हा खोडकर, चतुर आणि व्रात्य आहे. त्यांचे चम्कृतिजन्य वागणे हाच ह्या कथेच्या अनुभवविश्वाचा मुख्य घटक आहे. ह्या सोन्याच्या एकेका वागण्यातून ही कथा फुलत जाते. सोन्यानं खूप शिकावे, मोठे व्हावे, आपले पांग फेडावेत, ही त्याच्या आईची किमान इच्छा असते. कारण पतिनिधनानंतर ती नियतीसमोर हतबल होते. शाळेत जाताना मित्रांना आडवे पाय घालून पाडणारा, खेळातील 'म्होरक्या' ला तिकडे काय म्हणून हुलकावणी देऊन पळणारा, सोठाच्या बायडीची चेष्टा करणारा, शेजारच्या पारीबरोबर अंथरूणात शिरून डोळे झाकून चांदण्या मोजणारा आणि पेपरात न छापून आलेला वाचण्यात पटाईत असणारा हा सोन्या ह्या कथेच्या अनुभवविश्वाचा केंद्र घटक ठरतो व एकेका घटनाप्रसंगातून कथेची वीण घट्ट बसवितो. ह्या कथेतील संवाद हे थेट आशयाला, अनुभवविश्वाला नेहून भिडवणारे असेच आहेत. पहा: "काखेतलं वर्तमानपत्र काढलं व जमिनीवर पसरीत म्हणालो - "आये, मारतीस मार, पट्टे, पर ह्यांत लिहलंय ते आइक अगुदर." "त्यात डोंबलं तुज लिव्हलंय, व्हय रं?." "आगं, आइक तर आगुदर." आणि तिनं संमती न देण्याच्या आतच मी त्यात न लिहलेलं वाचू लागलो, "लातुरच्या साळंमधी एक पोरगं व्हतं. ते चवथीत नापास झालं. त्याला लई वाईट वाटलं. त्यानं हिरीत जाऊन जीव दिला व त्यामुळे त्याचा पराण गेला. त्येच्या माय बापाला बी लई दु:ख झालं . त्यांनीबी रडून रडून पराण सोडला."[८] असा हा सोन्या संपूर्ण कथेचे अनुभवविश्वच वाचकांना उलगडून दाखवितो.

"भरल्या घरचे पाहुणे" ह्या कथेमधून साकार होणारे बालमनोविश्वाचे अनुभव हे 'अभ्यास' ह्या कथेतील अनुभवविश्वाशी एकदम मिळतेजुळते असे आहेत. ह्या कथेतील छगण्या हा सोन्याप्रमाणेच खोडकर आणि बेरकी आहे. बऱ्याच दिवसांनी मामा भेटण्यासाठी येतो आणि हा छगण्या खायला दिल्याशिवाय ओळख देत नाही, तो वेळोवेळी मामाला जेरीस आणत असल्याचे दिसतो. छगण्याच्या वागण्यातील हे गुणदोषदेखील ह्या कथेला अनुभवसंपन्न बनवतात. हा छगण्या एखाद्या गोष्टीचे निरीक्षण किती बारीक करतो व त्यातून त्याच्या चमत्कारिक गुणांबरोबरच त्याचे अनुभवविश्व किती दांडगे आहे, हेही दिसून येते. छगण्याच्या तोंडच्या संवादातून त्याच्या भाषेची लकब व अनुभवाची विपुलता दिसून येते. पहा: छगण्या मामाला आणखी काही बरचंसं सांगणार होता; पण 'तेवढयात मामाच्या मागून बारीक हसणं आलं. कोवळं वाळुक खाताना कुरूकुरू आवाज निघतो. हिंग तसंच. मी मामाच्या खांद्यावरुन पलिकडे पाहिलं मामाच्या मागं एक पोरसवदा बाई उभी होती तीचा रंग उजळ होता व त्या उजळपणात तांबूस रंगाची खुलावट होती. नाक कळीदार होतं व ओठ निवडुंगाच्या बोंडातल्या गऱ्यासारखे लालभडक होते. तिच्या अंगावर पिवळसर काडयाचं टोपपदरी लुगडं होतं; अंगात कांद्याच्या पाती सारख्या रंगाची चोळी होती व कानात मोत्याच्या कुडया होत्या'.[९] छगण्याचा हा अनुभव वाचकांना प्रत्यक्ष समोर मोहून टाकणाऱ्या स्त्रीच्या अनुभवाच्या पातळीवर नेऊन सोडतो ह्यामुळे ही कथा अधिक रंजक बनते. अशा वातावरणनिर्मितीमुळे छगण्याचे अनुभवविश्व विविधतेने नटलेले दिसते.

" सांगावा" ह्या कथेमधील वातावरण बालमनोविश्वाचा धांडोळा घेत असले, तरी ते बालमनोविश्वाच्या इतर कथांपेक्षा पूर्णांशाने वेगळे आहे. श्रध्दा - अंधश्रध्दा, रूढी - परंपरा व नवससायास ह्यावर जगणारी पिढी व अंधश्रध्देवर तिचा असणारा विश्वास हाच ह्या कथेचा मुख्य अनुभव विषय आहे. प्राथमिक स्वरूपात हे भावविश्व यंका ह्या लहान मुलाचे असले, तरी तुकाची म्हणजे त्याच्या बापांची सर्व दु:खे ते सांगून जाते नियतीपुढे तो कसा शरण गेला आहे, अंधश्रध्देला तो कसा बिलगून बसलेला आहे, हे ह्या कथेतील अनुभवावरून समजून येते. आपल्याच मळयात यंका कावळा - कावळीची लागन पहातो, अशावेळी आपल्या घरात काहीतरी अनिष्ट प्रसंग घडणार, आपल्यावर काहीतरी अरिष्ट ओढवणार हे ओळखून तो हे टळावे, ह्यासाठी महाराकरवी सारस्याला निरोप धाडतो. अशा प्रकारचे वातावरण व त्याला बिलगून बसलेला हा समाज ह्यांचे चित्रण ही कथा करते. अशा स्वरूपाचे समाजमान्य अनुभव बोराडे आपल्या कथेत आणतात व एक वेगळेच बाळसे ते आपल्या कथेस आणतात. त्यामुळे ह्या कथा अनुभवाच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण ठरतात.[१०]

"झाड" ह्या कथेमधून धार्मिक वातारणाच्या पार्श्वभूमीवर उध्वस्त होऊ पाहणारे कुटुंबविश्वच समोर येते. बालमनोविश्वाचे प्रकटन करणारी ही कथा धार्मिकतेला स्पर्श करीतकरीत श्रध्दा - अंधश्रध्दा

ह्यामधून उभे राहणारे अनुभवविश्वच वाचकांसमोर उभे करते. प्राथमिक स्वरूपातच येथे बालमनाचे चित्रण येते. संपूर्ण कथेची वीण ही तशी ग्यानाकाकाभोवतीच आहे. काकाच्या अंधश्रध्दाळू मनावरून हे लक्षात येते. तारूण्याच्या तिसऱ्या प्रहारापर्यंत ग्यानाकाकांना आपल्या वंशाचा दिवा पेटेल की नाही, अशी शंका वाटते म्हणून ते हरेक नवससायास करून शेवटी दैवावर विश्वास टाकतात.[११]

बोराडे ह्यांच्या बालमानसविश्वे चित्रित करणाऱ्या कथा ह्या केवळ तेवढया एकाच घटकावर केंद्रिभूत होतात असे नाही; तर उलट बालमनोविश्वातून समाजातील विविध वृत्तीप्रवृत्तींचा वेध घेतघेतच त्या बालमनाचा तळ शोधण्याचा सतत प्रयत्न करतात. बालमनाची निखळ आणि वेगळी संवेदनशीलता बोराडे ह्यांची कथा समर्थपणे प्रकट करताना दिसते. ह्या निमित्ताने ते बालमनाशी अधिक जवळीक साधतात.

'' बलामत'' ही कथा स्वतंत्र अनुभवविश्व घेऊन साकारलेली दिसते. विधवेचे एक उपेक्षित जीवन व समाजाच्या दुष्ट नजरा ह्या विधवा स्त्रीला कशा प्रकारे नागवतात, समाजात तिला कसे वागवले जाते, हे ह्या कथेचे मुख्य अनुभवघटक आहेत. ह्या कथेला काही प्रमाणात कौटुंबिक पार्श्वभूमी आहे परंतु कथा पूर्णांशाने झुकते ती स्त्रीच्या दु:खाकडे.ऐन तरूण वयात नवऱ्याचे निधन होणे आणि त्याच्या अशा अचानक निधनाने तिचा घरातील माणसांनी तिरस्कार करणे, एक सामाजिक मालमत्ता म्हणून तिला वागणूक दिली जाणे व एक दिवस ती घरबसल्या दीराच्याच वासनेची बळी ठरणे असे जिवंत प्रत्ययकारी अनुभव घेऊन ही कथा साकारत जाते. दीराचा हा कपटीपणा तिच्या ध्यानात येताच तो तिच्या जिवावर उठतो. अशावेळी ती रात्रीअपरात्रीच भावाकडे जाण्यास घराबाहेर पडते. वाटेत तिला मारूती चव्हाण नावाचा एक अनोळखी माणूस बैलगाडी घेऊन खंडापूरला जाताना भेटतो. एक सामाजिक आणि नैतिक जाबबदारी म्हणून तो तिला गाडीत बसवतो. परंतु 'ती गरोदर आहे' हे जेव्हा त्याच्या लक्षात येते, तेव्हा तिला गाडीतून खाली उतरवतो व ही बलामत नको म्हणून जोर जोराने गाडी हाकतो, बैलाच्या शेपटया मुरगाळतो, प्रसंगी त्यांना चाबकाने फोडून काढतो. भेदरलेले बैल चौखूर धाऊ लागतात.[१२]

''काय सुदा न्हायलं नाय!'' ह्या कथेमधील लोकांना सततच्या दुष्काळामुळे हातातोंडाची किमान एकवेळ गाठ पडणे मुष्किल होते. त्यासाठी रोजच एकाच्या बांधावर कामाला जाणे त्यांना भाग पडते. इटुबा न्हाव्याची बायको मात्र रोजगाराचे निमित्त करून सोपानाबरोबर अनैतिक संबंध वाढवते. अशा प्रकारे ही कथा कामचुकार, बेइमान स्त्रीचा व्याभिचार असा अनुभव कथा वाचकांसमोर मांडते. सोपाना एक दिवस रात्रीच इटूबाच्या घरात शिरतो व इटूच्या बायकोशी अनैतिक चाळे करून परत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जाणार; एवढयात इटुबा जागा होतो व 'चोर! चोर!', म्हणून ओरडतो. सबंध गाव तेथे जमा होते व इटूला 'काय जोखमीचं चोरीला गेलंका,' म्हणून विचारू लागतो. तेव्हाचे इटूबाचे उद्‌गार पुढील काळजाला कसे स्पर्शून जातात, हे पाहण्यासारखे आहे, ''इटूबानं तोंड फिरवलं आणि उंबऱ्यात उभ्या असलेल्या बायकोला विचारलं, 'का गं, तुजं काय गेलं का ?' नतीला झोला देत ती म्हणाली, 'माझं न्हाई काय गेलं! त्यान सार घर धुंडाळले. काहीच चोरी झाली नव्हती. मग चोरानं नेलं तरी काय ? ' अचानक त्याची नजर त्याच्या बायकोच्या अंथरूणावर थांबली. तिच्या अंथरूणावर दाभणकाठी उपरणं पडलं होतं ! हे उपरणं पाहून त्याला रडू फुटलं आणि कपाळ बडवित इटुबा सांगू लागला, ''काय सांगू बाबानू! समदं काय गेलं माजं काय सुदा ऱ्हायलं न्हाई.''[१३]

''खण'' ह्या कथेमधून बोराडयांच्या वरील सर्व कथांपेक्षा वेगळा अनुभव पहावयास मिळतो. सरकारी अधिकारी त्यांची दुष्टपी वागणूक, त्यांचा स्त्रीलंपटपणा हा ह्या कथेचा अनुभवविषय आहे. माणिकराव फौजदार आपल्या अधिकाराच्या जोरावर हाताखालच्या हवालदाराला आपल्या इशाऱ्यावर नाचवतो. त्याने वापरलेली अरेरावीची भाषाच त्याच्या स्वभावाचा प्रत्यय देते पहा : ''घोडयावरून उडी मारून साहेब चावडीत शिरला. विजेरी प्रकाशात चावडीचा कोपरान् कोपरा तपासला. पाटलाचा पत्ता नव्हता. रामोशाचा पत्ता नव्हता.''हरामखोर कुटचे ! वेळेवर हजर राहता येत नाही ! एवढया दुरून आम्ही तंगडया तोडीत येतो आणि तुम्ही खुशाल झोपा काढता ? माणिकराव फौजदाराला समजलांत तरी कोण ? एकेकाची हड्डी मोकळी करीन.''[१४] असा हा फौजदार जेव्हा गावाला खण मारून परत निघतो, तेव्हा त्याचा अधिकार गळून पडून एका विधवा बाईच्या खोपटापुढे मलुल चेहरा करून तिच्याशी जवळीक निर्माण करून तिच्याशी अनैतिक संबंध जोडतो.

रझाकारी अत्याचारात पिचत पडलेला समाज आणि सुष्ट व दुष्ट ह्यांच्यातील वर्तमान संघर्ष चितारणारी पार्श्वभूमी 'सत्यानाश' ह्या कथेच्या अनुभवविश्वाला दृष्टिगोचर करताना दिसते. ह्या कथेतील बाबालाल हा रझाकारी प्रतिनिधित्व करणारा, मग्रूर व उर्मट असा एक गावकरी आहे. दुष्ट प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून तो ह्या कथेत येतो, तर सुष्ट म्हणून रंगराव व त्याचे कुटुंबिय ह्याचे चित्रण ह्या कथेत येते. गावालगत बाबालालचा ऊस मळा आहे त्याच्या ऊसात रंगरावचे गोरं (वासरु) रावळया हे गेल्याने तो त्याला पकडतो रूम्हण्याने बेदम मारतो. रंगरावच्या म्हाताऱ्या आईला हे कळल्यावर ती बाबालालकडे जाते व गोरं (वासरु) सोडून देण्याविषयी विनंती करते. पण बाबालाल म्हातारीला उर्मटपणे शिव्या देतो. शेवटी बाबालालने हातपाय बांधून मारुन मारुन मरणासन्न झालेला रावळया रंगरावाच्या दारात येतो आणि तेथेच तो प्राण सोडतो. येथे रावळयाच्या दु:खाने ढवळून निघणारी रंगरावच्या कुटुंबियांची मने व सरळ सरळ एका गावगुंडाने एका सरळ मार्गी कुटुंबियावर केलेला अन्याय

ह्या कथेचा अनुभवविषय बनून जातो.... पुढे हैद्राबाद संस्थान हे स्वंतत्र भारतात विलीन होते. रझाकाराची फूस मिळालेल्या बाबालालसारख्यांना लोक पकडतात व आगीचा लोळ करुन त्यात त्यांना जिवंत जाळतात. अशा प्रसंगी गावातील रझाकाराचे प्रतिनिधी जीव मुढीत धरुन लपून बसतात. त्यात बाबालालही असतो. तो गावकऱ्याच्या तावडीत सापडतो त्याचं घर पेटवून दिले जात व त्यातच त्याला फेकले जाते. अशा स्वरूपाचे अनुभवविश्व घेऊन ही कथा साकारते.[१५]

एकंदर, रा. रं. बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील सर्वच्या सर्व म्हणजे चौदा कथांमधील अनुभवविश्वातून त्यांची अनुभव घेण्याची समृध्दता, विचारांची परिपक्वता, मूल्यांची व आदर्शांची जपणूक करण्याची वृत्ती, दुष्टांची पायमल्ली करण्याची कुवत हे सर्व जाणवते. शिवाय ह्या कथासंग्रहातील अनुभव रसिक वाचकांना आपलेच वाटू लागतात. ह्यातच 'पेरणी' ह्या कथासंग्रहाचे खरे यश सामावलेले आहे. म्हणूनच ह्या कथासंग्रहातील अनेक कथांना कथास्पर्धेत प्रथम क्रमांकाची पारितोषके मिळाली आहेत.

## २.३. 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील अनुभवविश्व :

'कणसं आणि कडबा' (साकेत प्रकाशन, औरगाबाद, १९९४) ह्या कथासंग्रहामधील कथांमध्ये अनुभवविश्व मांडताना कथाकार बोराडे हे मानवी जीवनाविषयी गांभीर्याने विचार करु लागलेले जाणवतात. ह्या कथासंग्रहातील व्यक्ती व त्यांच्या व्यक्त झालेल्या जीवनजाणिवा ह्या समस्त मानवाच्या, त्याच्या अगतिकतेच्या जाणिवा आहेत, असे वाटू लागते. सारे मानवी जीवन हे एक प्रकारच्या अगतिकतेने व्यापून गेले आहे कोणीही त्यातून सुटलेला नाही. माणूस हा परिस्थितीचा गुलाम आहे. तो सभोतालची परिस्थिती बदलू शकत नाही, तर तो परिस्थितीपुढे शरण आल्याचा प्रत्यय जवळवजळ सर्वच कथांमधून बोराडयांनी मांडलेला आहे,असे दिसते.

'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील अनुभवविश्व विविधतेने नटलेले आहे. 'पेरणी' (१९६२) ह्या कथा संग्रहा प्रमाणे ह्याही संग्रहातील कथा कौटुंबिक, राजकीय अशा विविध अनुभव विश्वातून आलेल्या आणि दुष्काळी परिस्थितीला अनुलक्षून अशा आहेत. ह्या अनुभवविश्वाचे चित्रण बोराडयांनी कसे अनुभवगर्भ व चिंतनशील बनवले आहे, ते पाहू. ह्या कथासंग्रहातील 'बोचकं', 'उताराची वाट', 'लोढणं', 'मोसंबी', व 'मळा' ह्या कथा कौटुंबिक अनुभवविश्वातून साकार झालेल्या आहेत.

'बोचकं' ह्या कथेमधून कृषिप्रधान ग्रामसंस्कृती, कौटुंबिक वातावरण, ताणतणाव, व्याह्यांच्या मानपानाचा प्रतिष्ठेचा प्रश्न प्रसंगी मानपानासाठी प्राण सोडणारी माणसे असे कौटुंबिक भावविश्व समोर

येते. पुतळाला तिच्या सासरची मंडळी सातत्याने मानपानासाठी त्रासदायक वागणूक देत असतात. अचानक एके दिवशी तिला कायमचे माहेरी पाठवून दिले जाते हे पाहून बळीनाना खूप संतापतात व तातडीने ताकडीला जातात. 'आपल्या लेकीला ह्यो भडवा नांदवत नाही व्हय, बघू त्याची बहीण तरी कशी ताकडीत माझ्या मेव्हण्याकडे राहते ते', अशी बदल्याची भावना मनात घेऊनच ते मेहुण्याला नामदेवला ''तुम्ही नाक दाबा; आता त्येचं तोंड उघडतंय,'' असे म्हणतात आणि सारे अनुभवविश्वाच आपल्या डोळयासमोर तरळू लागते.[१६] अशा प्रकारची निवेदनाची भाषा अनुभवविश्व डोळयासमोर उभे करण्यास महत्त्वाचा प्रमाण घटक बनते म्हणून ह्या कथेतून छोटी छोटी वाक्य संपूर्ण अनुभवच सांगून जातात असे म्हणावेच लागते.

''उताराची वाट'' ह्या कथेतून चित्रित झालेली मानसविश्वे ही अधिकतर कृषीजीवनाशी निकडीत अशी आहेत. कृषिप्रधान पितृसत्ताक कुटुंबपध्दती मध्ये भिकाजी आपल्या कुटुंबाचा गाडा नेटाने हाकतो व मुलांसाठी इस्टेट कमवतो. परंतु हीच मुले मोठी झाल्यावर हतबल करतात, असे अनुभवविश्व ह्या कथेतून पहावयास मिळते. ह्या कथेतील बायना आणि भिकाजी ह्या वृध्द जोडप्याच्या वाटयाला आलेले दु:ख हे 'निसर्गप्रणित' असण्यापेक्षा 'मानवप्रणीत' अधिक आहे. कारण पोटच्या मुलांनीच ह्या वृध्द जोडप्याची 'वाटणी' केली आहे. वास्तविक ज्या अवस्थेत पती-पत्नींनी एकमेकांना जपायचे, सांभाळायचे असते; त्या अवस्थेत एकाच मुलाने दोघांचा भार का सोसावा, म्हणून त्या दोघांना वाटून घेतले जाते. ह्या विकलांग अवस्थेत काळजावर दगड ठेवून हे वृध्द जोडपे विरहव्यस्थेला सामोरे जाते. अशा अटळ, विकलांग व विरही अवस्थेचे अत्यंत जीवघेणे, परंतु तितकेच भावपूर्ण व प्रत्ययकारी चित्रण ह्या कथेतून येते. ह्या वृध्दांची पाळेमुळे जिथे रूजली - जखडली आहेत; तो शेतमळा, ती खोप आणि त्या खोपीकडे जाणारी उताराच वाट हे सर्व घटक ह्या वृध्दांचे अनुभवविश्व साकारताना चित्रणाचे माध्यम बनून राहिलेले आहेत.[१७] अशी ही कथा बोराडयांच्या कथासंभारातील एक लक्षणीय कथा वाटते ती ह्या अनुभवसंपन्नतेमुळेच.

''लोढणं'' ह्या कथेमधील अनुभवविश्व गावगाडयातील कौटुबिक सुखदु:खाचे आहे, कुटुंबातील तऱ्हेवाईक मंडळीच्या वागण्याने घरातील कोवळया मनांची उध्वस्त होऊ पाहणारी अवस्था व सोयरसुतक ह्यात जखडून पडलेली समाजव्यवस्था हे कथासूत्र ह्या कथेच्या अनुभवविश्वात पुढे आलेले दिसते. ''नामा गोसाव्याची सून माझ्या माहेरची आहे. ती आजच आली व्हती. आबा लई बिमार हाईत.'' नर्मदा असे सांगून जाताच मंजुळा भाऊरावाची म्हणजे नवऱ्याची विनवणी करते व वडिलांना उभ्याउभ्या भेटून येऊ म्हणते. भाऊराव येणं होणार नाही,' असे म्हणून स्पष्टपणे सांगतो. येथे

उर्मट जावई, त्याचा हेकट  व भांडखोर स्वभाव व त्यामुळे निर्माण झालेले तणावपूर्ण वातावरण पहावयास मिळते. पुढील वर्णन पहा :

> "दाजी असं का करायलेत गं"
> तिनं घाबरुन विचारलं,
> "काय झालं ?"

"तोंडात गुळनी धरल्यावानी निसतंच बसलेत. काय पुसायला गेलं; तर नीट सांगंना बी गेलेत." "वटभरणातला त्येंचा राग अजून तसाच हाय, न्हवं का" "तरी मला वाटलं तसं, घरात आबाला बगायला चला म्हनलं, तर तेबी कानानिराळं  टाकलं." "ते सोताबी येत नव्हते आन् मलाबी धाडीत नव्हते. म्या बळंबळं समदा हिसाब जुळवून आनला."[१८] अशा  प्रकारे जावयाची वागणूक कृषिप्रधान शेतकरी व त्यांचे ह्या जावयाशी वागण्यातील अनुभव हे सर्व काही चुटकी सरशी वरील संवादामधून वाचकांना उमजू लागते.

"मोसंबी"  ह्या कथेतून कृषिभूषण शेतकरी आणि त्याचे गावागाडयातील बोलणे चालणे, त्याचा रगेल व रंगेलपणा अशा अनुभव  विश्वात ही कथा आशयाची वीण राखताना दिसते.[१९] कृषिप्रधान बळवंतराव शेती करण्यात जसे पटाईत असतात तसेच ते इतर अनेक कामांमध्येही पटाईत असतात.  तमाशा - जलसा तर त्यांचा करमणुकीचा रोजचा प्रांत असतो. आपल्या दिना ह्या एकुलत्या मुलाने देखील आपल्यासारखे असावे, असे बळवंतरावांना नेहमी वाटत असते. तो तालुक्याला मॅट्रिकला शिकत असतो. त्याने शिक्षण थांबवून आपल्याप्रमाणे वागावे म्हणून ते गावात आलेला जलसा पाहण्यासाठी त्याला बरोबर घेऊन जातात. हे दोघे बापलेक जलशातील गाणी तोडण्यात 'दौलतजादी' करतात, 'कान्तानायकिनीनं बळवंतरावाला वश करून घेतलेले असते, तर त्याच फडातील एका तरण्या, शेलाटया बांध्याच्या पोरीनं दिनकरच्या नजरेत नजर मिसळली' अशा प्रकारचे अनुभव आपल्या कथांमधून बोराडयांनी समृध्दपणे मांडले, म्हणून त्यांच्या कथांना लोकाश्रय मिळालेला दिसतो.

ग्रामजीवनाशी एकनिष्ठपणे वागणे, ह्या वागण्यावर नियतीने घाला घालणे, नियतीपुढे शेतकऱ्याचे हतबल होणे, हे सर्व 'मळा' ह्या कथेतून साकारत गेले आहे.  पुंडलिकच्या वयाच्या ऐन पंचविशीत एक मूल पाठीमागे ठेवून त्याची पत्नी मरण पावते. हे मूल लहानाचे मोठे करण्यात पुंडलिकला त्रास सहन करावा लागतो. मुलाला दुसरी आई नको म्हणून तो दुसरे लग्न करीत नाही.  परंतु ऐन तारूण्य असल्याने त्याची वासना मात्र त्याला गप्प बसू देत नाही. हळूहळू त्याचे मूल रामा हा मोठा होत जातो इकडे पुंडलिक भैरू लमाण्याच्या बायकोबरोबर लगट करतो. ती रोज मळयात म्हैस चारायचे

निमित्त करुन येते. पुढे जेव्हा रामाच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा पुंडलिकला त्याचे हे प्रकरण खूपच महागात पडते. येथे नियती त्याचा पिच्छा सोडत नाही. त्याच्या ह्या प्रकरणाने पुंडलिक हताश होतो. कारण मुलाची जमलेली सोयरीक मोडते. "ढाकळ गावच्या पावन्याचा सांगावा आलाय,आमच्या भरावाशावर ऱ्हाऊ नका म्हणून त्यांनी कळवलंय." "तुला कोण म्हणालं?" "संतरामतात्यानं सांगितलं", "न्हाय तर न्हाय. आपुन थोडंच त्यांच्या भरवाशावर बसलोय". "काय म्हणणं हाय पावन्याचं?" एकदम वर्मी घाव घालावा, त्याप्रमाणे रामा म्हणाला, "भैरु लमाण्याची बायको हमेशा आपल्या मळयात म्हैस चारायला यितीया, हे कुणीतरी त्या पावन्याला सांगितलंय."[२०] अशा प्रकारची ओघवती भाषा आणि चटकदार संवाद ह्यांच्यामुळे ही कथा व कथेतील एकूणच अनुभव वाचकांच्या समोर जिवंत होतात.

अशा प्रकारे ग्रामसंस्कृती, गावगाडा, रूढी-परंपरा, रीतिरिवाज ह्या अनेक घटकांनी कुटुंबविषयक कथांना अनुभवसंपन्न केले. येथे खऱ्या अर्थाने बोराडयांची कथा अनुभवशील व अर्थपूर्ण वाटते. ग्रामीण जीवनातील एकएक घटना तिच्या आशयातून फुलत राहते व त्यातून ती समृध्दतेकडे झुकताना दिसते.

आता आपण 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील राजकीय अनुभवविश्व विचारात घेणार आहोत. रा. रं. बोराडयांच्या ह्या कथासंग्रहातील 'काळीज', 'वेस' आणि 'पोतेरा' ह्या कथा ग्रामीण भागाचे व तेथील राजकारणाचे अनुभवविश्व व्यक्त करीत असल्याने ह्या राजकीय कथांना खूपच महत्त्व प्राप्त होते. ह्या कथांचे अनुभवविश्व वरवर पाहता राजकीय पक्षांमधील संघर्षाचे जाणवते. परंतु त्यापुढे जाऊन एक भावनाशील मनाचा शोध ही ह्या कथांमधून घेतलेला जाणवतो. राजकीय पुढाऱ्यांचे अन्याय अत्याचार तरीही त्यांनाच मिळालेली बढती, बळी तो कानपिळी ह्या सर्व गोष्टींचा येथे प्रत्यय येतो.

जि.प. निवडणुकीचे चित्रण 'काळीज' ह्या कथेमधून आलेले आहे. मतदारसदस्यांना किडनॅप करण्यापासून अनेक युक्त्या प्रयुक्त्या, दंडकशाही, ह्या सर्व गोष्टी ह्या कथेचा अनुभवविषय झालेल्या आहेत. दादासाहेब जि.प. हातात राहावी म्हणून जयवंतराव आणि त्याच्यासारख्या अनेक मतदारसदस्यांना बंगल्यावर नजरबंद ठेवतात. त्यांच्यावर वारेमाप पैसा खर्च करतात. अखेर ते निवडणूक जिंकतात अशा स्वरूपाचे अनुभवविश्व ह्या कथेतून चित्रपटाप्रमाणे आपल्या डोळयासमोर तरळू लागते. परंतु उत्तरार्धात ही कथा राजकीय अनुभवांना बाजूला सारून भावनांकित होताना दिसते. जयवंतरावला दादासाहेबाची माणसे बंगल्यावर बंदिस्त करतात व मतदान होईपर्यंत त्याला बाहेर

सोडण्यात येणार नसते. परंतु इकडे जयवंतरावाचा मुलगा आजारी असतो त्याला पाहण्यासाठी जयवंतराव बंगल्यातून सटकतो आणि परत दादासाहेबाच्या बंगल्यावर येण्यास विरोध दर्शवतो. परंतु बरोबर आलेला दादासाहेबांचा माणूस कमलाकर हा " तुम्हाला इथं थांबता येणार नाय. बरोबर चलावे लागेल.दादासाहेबांचा हुकूम हाय" असे म्हणतो. त्यावर जयवंतरावने दिलेले उत्तर येथे संपूर्ण कथाच डोळयांसमोर प्रकट करण्यास मदत करते. पहा: "हात्, तुमच्या आयला तुमच्या राजकारणाच्या ..... हा घ्या माझा राजीनामा अन् हितनं काळं तोंडकरा. पुना हिकडं फिरकलाव, तर खबरदार !."[२१] अशा प्रकाराचे अनुभव ह्या कथेला समृध्द करताना दिसतात.

"वेस" ह्या कथेतील अनुभवविश्वदेखील 'काळीज' ह्या कथेप्रमाणेच राजकीय गुंडगिरीचे असे आहे.[२२] गावातील मेंबर फोडण्यापासून ठराव हाणून पाडण्यापर्यंतच्या व ग्रामपंचायत बरखास्त करण्यापर्यंतच्या,राजकीय गावगुंडीला बळी पडलेल्या माणसाचा अनुभव ही कथा वाचकांना तंतोतंत आणून देते. रंगनाथराव स्वत: गावच्या राजकारणात सामील अस्तात पण स्वत: कडे कधी पद घेत नसतात. आपले पॅनेल उभे करून ते सर्व पॅनेल निवडूण आणतात. ह्यावेळी गावातील केरबा आणि चांगा हे महार निवडून आलेले असतात. ते फुटिर गट तयार करण्याच्या प्रयत्नात असतात. परंतु अशावेळी रंगनाथराव केरबालाच सरपंच करतात व त्याचा राजकीय गावगुंडीत वापर करुन घेतात. ह्या कथेतून ह्याचेच चित्रण आलेले आहे. 'वेस' पाडण्याचा ठराव तर ते हाणून पाडतातच. पण सरपंचकीच्या बदल्यात केरबाच्या बायकोला ते वाडयावर बोलवून रखेलीप्रमाणे वागणूकही देतात.

"पोतेरा" ह्याही कथेची पाश्वभूमी राजकीय अशीच आहे.[२३] राजकारण्यांचे अन्याय-अत्याचार आणि तरीही त्यांनाच पुढे पुढे फायदे मिळत जातात. अशा स्वरूपाचे अनुभवविश्व ह्या कथेतून फुललेले दिसून येते. सर्वसामान्य जनतेचे प्रातिनिधित्व करणाऱ्या सुर्याजीसारख्या तरूणाचा केवळ आश्वासने देऊन वापर केला जातो, असाही अनुभव ह्या कथेतून येतो. मतदाराचा तो प्रतिनिधी असतो. शेतकरी सहकारी साखर कारखान्यात सभासद असणारे आबासाहेब एक दिवस कारखान्याचे चेअरमन होतात आणि कारखान्याच्या आजुबाजूला फिरणाऱ्या मोकळया हातांना काम देण्याऐवजी त्यांना 'बाई - बाटली' कडे वळवतात. चेअरमन झाल्यापासून ते भ्रष्टाचाराचे सत्रच अवलंबतात. अशाच भ्रष्ट माणसाचा कारखान्याच्या वार्षिक सभेत कार्यकुशल चेअरमन म्हणून सत्कार केला जातो आणि एक दिवस त्याला विधान सभेचे तिकीटही मिळते. हे तिकीट त्याला नेक, इमानदार आहे म्हणून नव्हे; तर पक्षासाठी पैसा पुरविणारा मालदार म्हणून मिळालेले असते.

अशा स्वरूपाचे अनुभवविश्व बोराडयांच्या ह्या तिन्ही कथांमधून चित्रित झालेले पहावयास मिळते. ह्या तिन्ही कथांमधून गावकीच्या राजकारणापासून आमदारकीच्या राजकारणापर्यंतचा व सहकारी साखर कारखान्यापासून जि.प. पर्यंतच्या राजकारण्यांच्या वृत्तीप्रवृत्तींचा खरपूस समाचार घेतला आहे व ह्या कथा वर्तमान राजकीय स्थितीचे वाचकांना दर्शन घडवतात.

दुष्काळी परिस्थितीला अनुलक्षून असलेल्या कथांच्या अनुभवविश्वाचा विचार करता बोराडयांच्या कथेतून दारिद्रयात होरपळलेल्या, पिडलेल्या, नाडलेल्या ग्रामीण माणसांचे चित्रण अधिक प्रमाणात येते. त्यातून ग्रामीण भागात पसरलेल्या दारिद्रयाचे संपूर्ण चित्रण येते. ''हंगाम'', ''अवर्षण'', ''कर्जमुक्ती'' व ''पडझड'' ह्या कथा तशा होत.

''हंगाम'' ह्या कथेमध्ये सततचा दुष्काळ आणि निसर्गाची दैवाधीनता ह्यावर अवलंबून असलेले ग्रामजीवन आणि ह्या ग्रामजीवनात दुष्काळामुळे मानवाचे होणारे अतोनात हाल, हाच मुख्य अनुभवपूर्ण घटक आहे. देवबाच्या घरातील निम्म्याहून अधिक माणसे पोट भरण्यासाठी कारखान्यावर जातात दर वर्षी त्यांचे असे ठरलेले गणित असते. ह्या शेतकऱ्यांना मुकी जनावरे कशी जतन करावी, हा मुख्य प्रश्न असला; तरी 'मिरूग मव्हरलाकी' (मृग नक्षत्र सुरू झालेकी) त्याला शेतीच्या मशागतीच्या कामाचे वेध लागलेले दिसतात. देवबाचा मुलगा मात्र कारखान्यावरच जाऊन बसलेला असतो. कारण शेतात कितीही मेहनत केली,तरी उत्पन्न काहीच निघणार नाही, हे त्याला माहीत असते. हा भागच मुळी सततच्या दुष्काळाच्या छायेत मोडत असतो. म्हणून ही मंडळी कारखान्याचा हंगाम असे पर्यंत तेथेच थांबतात. देवबाला मात्र काळया आईची ओटी भरण्याची काळजी लागून राहिलेली असते. अशा पध्दतीने साखर कारखान्याचा हंगाम येथे ह्या कथेतून साकार झालेला दिसून येतो.[२४]

''अवर्षण'' ही कथा सततचा दुष्काळ आणि अन्नपाण्यासाठी करावी लागणारी भटकंती, त्यातून सर्वसामान्यांची कशी उपासमार होते व दुष्काळामुळे हरेक प्रश्न शेतकरी आणि शेतमजुरांना कसे हैराण करून सोडतात, ह्या स्वरूपाचे अनुभवविश्व व्यक्त करते. नांदगावचे शेतकरी दुष्काळाच्या तडाख्यात लाह्या भाजाव्यात, त्याप्रमाणे होरपळून निघतात. अन्नापेक्षा पाण्याचा प्रश्न गंभीर रूप धारण करतो. गावात कुठेच पाणी नाही, एवढा जबरदस्त तडाखा नांदगावाला बसतो. कितेक गुरे दावणीलाच मरतात. पाण्यामुळे दावणीच्या दावणी बसू लागतात. जिथे माणसांना ओट ओले करावयाला पाणी नाही, तेथे जनावरांना कुठून आणणार, असा गंभीर प्रश्न निर्माण होतो ह्याला अपवाद फक्त शिवराम मानकराच्या विहिरीचा असतो. पण तो माणसांना पाणी पाजण्यापेक्षा उसाला पाजणे अधिक महत्वाचे मानतो. अखेर गाव त्याला वाळीत टाकते. अचानक एक दिवस त्याच्या वाडयाला आग लागते. गावात आलेला

पाण्याचा टँकर मानकरच्या पेटलेल्या वाडयाकडे न्यावा, असे अण्णाराव सांगतात ह्यावर मगन रणदिव्याचे उद्‌गार दुष्काळाची दाहकता स्पष्ट करण्याच्या दृष्टीने किती समर्पक आहेत, पहा: ''आमच्या बी पोटात आग पेटलीया. अशा हालतीत आमी पान्याचा टँकर हितनं हलू देनार नाय.''[२५] अशा प्रकारे दुष्काळी वातावरण जिवंत करण्यात व ते अनुभवविश्व साकार करण्यात ही कथा लक्षणीय ठरलेली दिसून येते.

''कर्जमुक्ती'' ह्या कथेचे अनुभवविश्वही 'अवर्षण' ह्या कथेशी तंतोतंत मिळते. पाणी हाच मुख्य प्रश्न येथेही गावकऱ्यांना भेडसावतो. हा प्रश्न शासनदरबारी अधिकारी कसा सोडवितात, ह्याच्या संबंधित अनुभवविश्व ह्या कथेतून प्रत्ययाला येते. गाव पिण्याच्या पाण्यासाठी धडपडत असतो आणि गावठाणाच्या हद्दीतच परबतरामची विहीर असते. गावतलाठी, गटविकास अधिकारी व तहसीलदार जीपमधून उतरून विहिरीवर येतात. विहिरीची पूर्ण पाहणी करतात. दाभाडे तहसीलदार परबतरामाला उद्देशून म्हणतात, ''तुमच्या गावचे पिण्याच्या पाण्याचे फार हाल होत आहेत. तुमची विहीर ताब्यात घ्यायचा आम्ही विचार करतोय. तुमच्या गावच्या लोकांना पिण्यासाठी पाणी पुरवायचं आम्ही ठरवितोय.''[२६]

''पडझड'' ह्याही कथेतील अनुभवविश्व दुष्काळी परिस्थितीला अनुलक्षूनच आहे. परंतु त्यात काही वेगळेपणा आहे. तो वेगळेपणा ओल्या दुष्काळामुळे आलेला आहे. त्यातून शेतकऱ्यांची व शेतमजुरांची झालेली वाताहत दिसून येते. ह्या कथेची सुरूवातच मुळी उत्कंठावर्धक आहे. त्यामुळे ओल्या दुष्काळाचे भीषण रूप वाचकांसमोर उभे राहते. पहा: ''आभाळाला भोक पडल्यावानी झालं होतं. दाभणाच्या टोकावनी धारा गळत होत्या. गावातल्या रस्त्यात पाणी मावत नव्हतं. रस्त्यात न मावणारं पाणी मुसंडी मारल्यावाणी घरात शिरत होतं. सबंधगाव पाण्यात उभं असल्यावाणी वाटत होतं. गोविंदानं बसल्या बसल्याच हात लांबविला घराचं दार किंचित किलकिलं केलं. त्याबरोबर सपकारा मारावा; तसं थंडगार, बोचरं वारं पावसाच्या टपोऱ्या थेंबासह घरात शिरलं.गोविंदानं पटकन्‌ दार लावून घेतलं.''[२७] अशा प्रकारचे पावसाचे उग्र रूप आणि त्यामुळे गावाला आपापल्या घरातच बसून राहावे लागते. बसून राहणे म्हणजे अन्नानाही, ही येथील व्यवस्था. मग करणार तरी काय? ह्यावर उपाय म्हणून गोविंदा व सिमंता हे स्वत:च्या घराची भिंत स्वत:च पाडतात व सरकार दप्तरी पडझडीचा फॉर्म भरूण देतात. अशा प्रकारे दुष्काळाला अनुलक्षून लिहिलेल्या कथांमध्ये ह्या कथेचे अनुभवविश्व वेगळे व वास्तवतेचे भयाण रौद्र रूप व्यक्त करताना दिसते.

14132
A

अशा प्रकारे दारिद्र्याचे चित्रण करणाऱ्या बोराडयांच्या कथांमधून तेथील माणसांच्या दु:खाला केवळ दारिद्र्य हेच एकमेव कारण आहे, हे स्पष्ट होते. केवळ ह्याच एका कारणात तेथील व्यक्तिमनाचे संपूर्ण भावविश्व गुरफटून गेलेले आहे. म्हणूनच दुष्काळाच्या अनुभवांचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा अफाट दारिद्र्याशी तडजोडीची भूमिका घेऊन साकारतात. ह्यातून बोराडयांच्या अनुभवविश्वाचे सामर्थ्यच लक्षात येते. 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील काही कथांमधून सुशिक्षित समाज, अधिकारीवर्ग आणि त्याचे वागणे - बोलणे, त्याचा स्वभावधर्म व त्याची गुणवैशिष्टये ह्या गोष्टी अनुभवविश्वातून साकार झाल्याच्या दिसून येतात. ''ओझं'', 'संसार' आणि ''भरती'' ह्या कथांचा त्यात समावेश होतो.

''ओझं'' ह्या कथेमध्ये एक सुशिक्षित तरूण, नोकरीच्या शोधात असताना औरंगाबादला एका कंपनीत नोकरीला लागतो. पत्नी माहेरी गेलेली असताना तिला आणायला म्हणून जातो व येताना एक नवीनच 'ओझं' बरोबर घेऊन येतो, असे अनुभवविश्व ह्या कथेत येते. परत येण्याच्या दिवशी सासरा हा आपल्या लहान मुलीला म्हणजे बबडीला जावई व लेक ह्यांच्या बरोबर औरंगाबादला पाठवतो. राजाराणीच्या संसारात हे बबडीचं 'ओझं' जावयाला कसे अवजड होते, हेच ह्या कथेतून दिसते. [२८]

''संसार'' ह्या कथेमधून एका सुशिक्षित व अनुभवी प्राध्यापकाचे अनुभवविश्व साकारलेले आहे. [२९] मूळचा खेडयातील एक मुलगा शिकून शहरात प्राध्यापक म्हणून नोकरीला लागतो. तो नोकरीमध्ये स्वत:ला बदलत जातो, ह्याच्याभोवती ही कथा गुंफत जाते. अशा ह्या प्राध्यापक सावंतांना आज पत्नी माहेरावरून येणार म्हणून हुरहूर लागून राहिलेली असते. वारंवार ते मनगटावरील घडयाळाकडे पाहत पत्नीची वाट पाहत असतात. पत्नीदेखील खेडयातील असल्यामुळे तिला वेळेचे तितकेसे महत्त्व नाही. प्रा. सावंताची बायको आज येणार, ही चर्चा सहकारी प्राध्यांपकांमध्ये होते. प्राचार्य मिटिंग असतानादेखील प्रा. सावंताना रजा देतात. प्रा. सावंत बस स्टँडवर मस्तपैकी चहा पिऊन सिगारेट ओढत थांबतात व प्रत्येक एस्.टी. आली की उठून बायको शोधत राहतात. असा बराचवेळ जातो आणि मग त्यांना त्यांची पत्नी दिसते. वर्तमान अनुभवविश्वात ही कथा फुलत राहते.

''भरती'' ह्या कथेतील एक सुशिक्षित बेकार तरूण नोकरी मिळविण्यासाठी वणवण भटकून निराश होतो. शेवटचा प्रयत्न म्हणून तो आपल्या जिवलग मित्राला बरोबर घेऊन मिलिटरी भरतीसाठी औरंगाबादला जातो. तेथे भरतीऐवजी वेगळाच प्रसंग ह्या दोघांसमोर उभा राहतो. ठरलेल्या वेळेत भरती चालू होत नाही. म्हणून हा भास्कर भरतीला आलेल्यांना 'रास्ता रोको' ची हाक देतो. त्यातून औरंगाबाद-पुणे राज्य रस्ता दुतर्फा तुंबला जातो. परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी पोलीस

'लाठीमार' करतात,मग एकच पळापळ होते,भास्कर पळ काडण्याचा प्रयत्न करतो. परंतु पोलीस त्याला गाठतात. लाठीचा सपाटा पाटीत बसताच भास्कर बेशुध्द होऊन खाली पडतो. अशा स्वरूपाच्या अनुभवविश्वात ही कथा वाचकांना घेऊन जाते व शेवटी शोकात्मकतेकडे वळते.[३०]

अशा कथांमधून दिसणारे अनुभवविश्व हे काही अंशी बदल स्वीकारणारे दिसून येते. परंतु ह्या बदलामागे ग्रामीण संस्कृतीच असल्याचे दिसते. शिवाय अशा कथांमधून बोराडयांची अनुभवक्षमता व विवेचक वृत्तीही दिसून येते. अनुभवनिर्मितीच्या घटकांची मांडणी बोराडे इतक्या प्रभावीपणे करतात की तो अनुभव वाचकांना प्रत्यक्ष आपल्या समोरच घडत असल्याचा भास होतो, नव्हे, तो अनुभव माझाच आहे, अशीही वाचकांची प्रतिक्रिया त्यांच्या कथांना मिळते.

समान अनुभवविश्व असणाऱ्या कथा पहिल्यानंतर काही कथा ह्या स्वतंत्र आशयसुत्र व वेगवेगळे अनुभवविश्व व्यक्त करीत असलेल्या दिसतात. "मुराळी", "तोल", "दिमाख", 'कणसं आणि कडबा' व "वेढा" ह्या त्या कथा होत.

"मुराळी" ह्या कथेमधील एकनाथ 'मूळ' म्हणून बहिणीच्या गावाला जाण्याचे निमित्त करून सांगवीला जाण्याचा बेत आखतो. तेथे जाधवाच्या कावेरीला भेटून तिला पळवून नेऊन लग्न करण्याचाही बेत तो आखतो. त्यातून कथा अधिक मोहक होत जाते. कथेची सुरूवातच मुळी वाचकांची उत्कंठा वाढवणारी अशी आहे. जाधवाच्या कावेरी बरोबर एकनाथचा प्रेमसंबध असतो. ह्या परिस्थितीत तिचा विवाह होतो. त्यामुळे एकनाथचा प्रेमभाव अनावर होतो व कावेरीला पळवून नेऊन तिच्याशी लग्न करण्याचा बेत आखून तो जातो. कावेरी मात्र पूर्णपणे बदललेली पाहून त्याचा प्रेमभावच मावळतो. ह्या कथेमधील अनुभवविश्व संवादामुळे आणि निवेदन कौशल्यामुळे फुललेले दिसते. पुढील संवाद पहा :

"तुम्ही कोन हाव. तुमचा-तिचा काय संबंध व्हता....?"
एकनाथनं घाबरून विचारलं,
"हे समदं हिनं तुम्हाला सांगीतलं?"
"हे समंद तर हिनं तवाच....."

नवऱ्याने कावेरीचे विवाहापूर्वीचे प्रेमप्रकरण समजून घेतल्याणे कावेरी पूर्णपणे बदलते व कौतुकाने नवऱ्याकडे बघत ती म्हणते,

"तुमी असं मनं मोठं केल्यावर म्या बदलायला नकू व्हतं म्हणा की."

''अगं, तू बदललीस ह्येच्यात कायबी नवल न्हाई. तुला बदलायला लावायला निदान म्यातरी व्हतो-पर कुनी बदलायला लावायला नसताना एकनाथरावांनी सोताच सोताला बदलून घेतलं, ह्येच्यात त्येंची खरी कमाल हाय.''[३१] अशा प्रकारे कावेरीला बदलेली पाहून एकनाथही पूर्णपणे बदलतो व मूळ म्हणून आलोच आहोत, तर हे नाते निभवायचे तो ठरवितो.

''तोल'' ह्या कथेमधून कौटुंबिक भावविश्वाबरोबरच सामाजिकतेच्या अंतरंगातील एकएक पदर उलगडत गेलेले दिसतात. कर्तृत्वशून्य नवऱ्याच्या वागण्याने या कथेतील स्त्रीवर कसे अनर्थ ओढवतात, अशा प्रकारचे अनुभवविश्व ह्या कथेमधून येते. आळशी आणि कामचुकार नवऱ्याबरोबर प्रपंच करीत ह्या कथेतील स्त्री राबताना दिसते. मुलाबाळासाठी आणि नवऱ्यासाठी रोज एकाचा बांध तिला पाहावा लागातो. नवऱ्याच्या अशा वागण्याचा फायदा घेऊन एक दिवस गायकवाडाचा संपत तिच्या घरासमोर येतो व गुळचट हसून तिला कामाला येण्यास सांगतो. संपतचा डाव तिच्या लक्षात येतो. ती त्याला खडसावून 'मला जमायचं नाय', म्हणून सांगते व झालेला प्रकार ती नवऱ्याला सांगते. तिचा नवरा खरोखरच कसा कर्तृत्वशून्य आहे, हे पुढील वर्णनावरून लक्षात येते : ''बऱ्याच वेळानंतर तो आला. ती दचकलीच, त्याच्याकडे बघत राहिली. चालता चालता त्याचा तोल जात होता. पडता पडता तो स्वत:ला सावरीत होता, स्वत:शीच काहीतरी बडबडत होता. दाराचा आधार घेत तो घरात आला. तिच्याकडं बघत तो वाकडं तिकडं हसला व छातीवर हात मारीत व उचक्यादेत म्हणाला,'' ''म्या गेलतो त्येच्याकडं... मस्त खडसावला त्येला. असं आपल्याला चालणार न्हाई म्हनलं... पाया पडला माज्या.... नाफ कर म्हनला मला.... म्या त्येला माफ केलं.... तू मला भजं कर.... आटप जल्दी.''[३२] अशा प्रकारचे जिवंत व ज्वलंत वास्तव ह्या कथेतून आपल्या डोळयासमोर उभे राहते.

''दिमाख'' ह्या कथेतील वातावरण कथासंग्रहातील इतर सर्व कथांपेक्षा वेगळे आहे. भरल्या अंगाची, सावळया रंगाची व काहीसे शहरी वळण असलेली पोरगी पहिल्या नवऱ्याला सोडून शहरात जाते व शहरी वातावरणात रमून जाते, असे अनुभवविश्व ह्या कथेतून आपल्यासमोर येते. मांगाची राधिका शहरात जाऊन सलिमची रखेल बनते व तोच आता मला सर्व काही आहे, असे बोलते. एकदिवस ती मोठया दिमाखात गावात येते. गावातील चार टगे तिचा मागोवा घेतात. दत्तू खराडे हा एस्. टी. तील हमाल तिची सुटकेस घेऊन बरोबर चालू लागतो. परंतु जेव्हा ती परसा मांगाची लेक आहे, हे त्याला कळते, तेव्हा तो तिची सुटकेस खाली ठेवतो. दिमाखात आलेल्या राधिकेला तिची आईसुध्दा ओळखत नाही, एवढी ती बदलली आहे.[३३]

''वेढा'' ह्या कथेमधून अधिकारीवर्गाची वागणूक, त्याची भ्रष्टाचाराची गलिच्छ प्रकरणे व त्यामुळे तडाखा बसलेले शेतकरी अशा अनुभवविश्वाचे दर्शन घडते. श्रीपती ज्वारी विक्री केंद्रावर ज्वारीची चार पोती गाडीत टाकून विकण्यासाठी म्हणून येतो. काटेवाले आणि आडते व त्यांचे मुनीम पहिल्या दिवशी शेतकऱ्यांची मापे लावून घेत नाहीत आणि दुसऱ्या दिवशी पण त्यांना काही निश्चित सांगत नाहीत. शेवटी श्रीपती कृषिउत्पन्न बाजार समितीच्या चेअरमनला भेटतो. तेथे फक्त चेअरमन आपल्या अधिकाराची धम्मक दाखवतो व श्रीपतीची काहीच विचारपूस करीत नाही. अखेर तिसऱ्या दिवशी पण चेअरमनचा स्वस्त धान्य दुकानचा माल 'ब्लॅक मेल' साठी बाहेर जाणार असतो. श्रीपती काही शेतकऱ्यांच्या मदतीने त्या ट्रकला बैलगाडयांचा वेढा घालतो. तहसीलदारसाहेब येईपर्यंत तो हा वेढा तसाच राहू देतो. अखेर तहसीलदार साहेब येतात 'ब्लॅक मेल' साठी जाणारा माल जप्त केला जातो. शेतकऱ्यांच्या एकजुटीचा कसा वापर केला जाऊ शकतो, हेच ह्या कथेतून सांगितले आहे.[३४]

''कणसं आणि कडबा'' ह्या कथेमधून दुष्काळाबरोबरच शेतकरी संघटनेचा शासनाबरोबरचा संघर्ष आणि त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती व भोगावे लागलेले परिणाम असे अनुभवविश्व पहावयास मिळते. शेतकऱ्याबरोबरच मुक्या प्राण्यांचेही चारापाण्याकरिता हाल होऊ लागतात. अशा वेळी घरातील माणसांइतकेच, किंबहुना त्याच्यापेक्षाही जास्त प्रेम जनावरावर आहे, अशी जनावरे कसाबाच्या दावणीला जाऊ लागतात. दुष्काळाचा हा भीषण प्रश्न समोर आ वासून उभा असताना गावातील कितीतरी बैल आबाराव शेळक्याच्या शेतावर केवळ चाऱ्याच्या मोबदल्यात राबू लागतात. अशा परिस्थितीत सुखदेवसारखा सुशिक्षित तरूण शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ३०/४० शेतकरी संघटित करतो. मुक्या प्राण्यांचा ज्वलंत प्रश्न शासनाने सोडवावा ह्यासाठी तहसीलदार रावळे साहेबाच्या ऑफिससमोर सुखदेव ह्या ३०/४० शेतकऱ्यांना व त्यांच्या बैलांना घेऊन 'मेख रोखो' आंदोलन करतो. अशा प्रकारचा अनुभव घेऊन ही कथा वर्तमान काळातील वाचकांना ७०/७२ च्या दुष्काळामध्ये नेऊन सोडते.[३५] अशा प्रकारे मुक्या प्राण्यांच्या दुःखांना, त्यांच्या वेदनांना बोराडयांच्या लेखणीने आपला विषय बनविले. मराठी कथेच्या दृष्टीने हा नवीनच प्रयोग होता. त्यामधील प्रगल्भ अशा अनुभवविश्वामुळेच बोराडयांना ह्या कथांनी लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसविलेले दिसते.

अशा प्रकारे 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील बोराडयांचे अनुभवविश्व हे विविधतेने नटलेले आहे. कौटुंबिकजीवन, स्त्रीपुरूषसंबंध, धार्मिक भावना, मुलांचेविश्व अशा वेगवेगळया थरांमधील अनुभवविश्व 'कणसं आणि कडबा' मधील सर्वच्या सर्व म्हणजे वीस कथांमधून दिसून येते. त्यातून बोराडयांच्या संपन्न कथाविश्वाची वाचकांना कल्पना येते.

## २.४. समारोप :

अशा प्रकारे रा. रं. बोराडयांच्या कथांमधील अनुभवविश्वाचा विकास हा सतत वाचकांची उत्कंठा वाढवत ठेवणारा असा आहे. त्यांच्या कथा आपल्या प्रारंभातच वाचकांच्या मनाची पकड घेतात, तर औसुक्यपूर्ण विकास आणि अनपेक्षित खिळवून ठेवणारी अखेर पाहण्यासारखी असते. कथांची सुरूवातच आकर्षक असल्याने वाचकांची पुढे काय, पुढे काय, अशी उत्कंढा वाढते. त्यासाठी विशिष्ट भाषाशैली, आकर्षक आणि चटकदार संवाद ते वापरतात. त्यामुळे त्यांच्या कथा अधिक वाचकप्रिय होतात. त्यांच्या प्रत्येक कथेचा शेवट हा वाचकांना विचार करायला लावणारा व त्यांच्या मनात तो रेंगाळत राहणारा असा असतो.

एकूणच इतर कथाकारांच्या कथा आणि बोराडयांच्या कथा ह्यांच्यामध्ये खूप मोठा फरक जाणवतो कारण बोराडयांच्या कथांमधील अनुभवविश्वामध्ये प्रामुख्याने माणसांचाच विलक्षण वेध घेतलेला दिसतो. त्यातून त्यांची अनुभव घेण्याची समृध्दता, विचारांची परिपक्वता व मूल्यांची जपणूक करण्याची धडपड जाणवते. ग्रामीण जीवनार्शी ते समरस झाल्याचे दिसतात, अशा प्रकारचे वैविध्यपूर्ण व समृध्द असे अनुभवविश्व त्यांच्या कथांमधून पहावयास मिळते असे म्हणता येते.

----------: ❈❈❈❈❈ :----------

# संदर्भ व टीपा :

*( जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमवृत्ती समजावी. )*


१. बोराडे रा. रं., "माझी वाङ्मयीन वाटचाल"(चंद्रकुमार नलग्यांनी घेतलेली मुलाखत), 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका', कोल्हापूर, जाने.- –जून १९९७ (रा. रं. बोराडे विशेषांक), पृ. ६.

२. पहा: बोराडे रा. रं., "पीळ", 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२, पृ.९-१८

३. पहा: तत्रैव, "ताण", तत्रैव, पृ.३७-४९

४. पहा: तत्रैव, "हुरडा", तत्रैव, पृ.६५

५. तत्रैव, "हुंदका", तत्रैव, पृ.११८-११९

६. पहा: तत्रैव, "खानदान", तत्रैव, पृ.१२२-१३५

७. तत्रैव, "पेरणी", तत्रैव, पृ.१५१

८. तत्रैव, "अभ्यास", तत्रैव, पृ.९९-१००

९. तत्रैव, "भल्या घरचे पाहुणे", तत्रैव, पृ.३६

१०. पहा: तत्रैव "सांगावा", तत्रैव, पृ.५०-६०

११ पहा: तत्रैव, "झाड", तत्रैव, पृ.१३६-१४३

१२. पहा: तत्रैव, "बलामत", तत्रैव, पृ.१९-३०

१३. तत्रैव, "काय सुध्दा ऱ्हायलं नाय", तत्रैव, पृ.३६-३७

१४. तत्रैव, "खण", तत्रैव, पृ.११६

१५. पहा : तत्रैव, "सत्यानाश", तत्रैव, पृ.८५-९१

१६. पहा: बोराडे रा. रं., "बोचकं", 'कणसं आणि कडबा',साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४,पृ.१२

१७. पहा: तत्रैव, "उताराची वाट" , तत्रैव, पृ.१५-२१

१८. तत्रैव, "लोढणं" , तत्रैव, पृ.३०

१९. पहा: तत्रैव, "मोसंबी" , तत्रैव, पृ.६२-६७

२० तत्रैव, "मळा", तत्रैव, पृ.७९

२१. तत्रैव, "काळीज", तत्रैव, पृ.३८

२२. पहा: तत्रैव, "वेस", तत्रैव, पृ.८३-९२

२३. पहा: तत्रैव, "पोतेरा", तत्रैव, पृ.१४१-१४८

२४. पहा: तत्रैव, "हंगाम", तत्रैव, पृ.५६-६१

२५. पहा: तत्रैव, "अवर्षण", तत्रैव, पृ.९८

२६. पहा: तत्रैव, "कर्जमुक्ती", तत्रैव, पृ.१२०

२७. तत्रैव, "पडझड", तत्रैव, पृ.१३३

२८. पहा: तत्रैव, "ओझं", तत्रैव, पृ.३९-४५

२९. पहा: तत्रैव, "संसार", तत्रैव, पृ.५०-५५

३०. पहा: तत्रैव, "भरती", तत्रैव, पृ.१०८-११६

३१. तत्रैव, "मुराळी", तत्रैव, पृ.२६-२७

३२. तत्रैव, "तोल", तत्रैव, पृ.४९

३३. पहा: तत्रैव, "दिमाख", तत्रैव, पृ.६८-७५

३४. पहा: तत्रैव, "वेढा", तत्रैव, पृ.१२५-१३२

३५. पहा: तत्रैव, "कणसं आणि कडबा", तत्रैव, पृ.९९-१०७

----------: ✻✻✻✻✻ :----------